Lands - Bombay Suburban District.
Survey No.141-A of Ambivali.
Grant of - - - to the Vyas
Co-operative Housing Society.

GOVERNMENT OF MAHARASHTRA,
Revenue and Forests Department,
Resolution No.LCS-2565/7-AI(Unit).
Sachivalaya, Bombay-32, 8th August, 1966.

RESOLUTION:- Government is pleased to grant Government Land comprising of 2 plots bearing No.74,75 in the layout approved by the Town Planning Department from Survey No.141-A in Ambivali in Bombay Suburban District to the Vyas Co-operative Housing Society for construction of residential buildings for accommodating its members whose list is appended to this Government Resolution duly approved. The society shall admit 6 more members as may be directed by Government.

2. The Vyas Co-operative Housing Society shall pay to Government the Occupancy Price for the land in accordance with the orders issued in the Government Resolution, Revenue and Forests Department No.LCS-1064/10352-B, dated 21st January 1965.

3. The grant shall be also subject to the terms and conditions prescribed in the Government Resolution, Revenue and Forests Department No.LCS-43247-B, dated 23rd April 1965.

4. The possession of land shall be given to the Society only after Occupancy Price is paid by the Society and sanad is executed in its favour.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

COLLECTOR BOMBAY SUBURBAN DISTRICT DATE 20 AUG 1966

(S.B. PATIL.)
Under Secretary to Government.

Accompaniment:- A list of members.

To:

The Commissioner, Bombay Division,
The Additional Collector, Bombay Suburban District,
The Settlement Commissioner and Director of Land Records, Poona,
The Registrar of Co-operative Societies, Maharashtra State, Poona,
The District Deputy Registrar of Co-operative Housing Society, Bombay,
The Deputy Director of Town Planning, Bombay,
The Accountant General Maharashtra State, Bombay,
The Pay and Accounts Officer, Bombay,
The Resident Audit Officer,
The Finance Department,
The Urban Development and Public Health Department,
The Agriculture and Co-operation Department.

List of Members.
S.No.141-A Ambivali.
Vyas Co-operative Housing Society.
LCS-2625/7-AI(Unit).

| Sr.No. | | Name of the member. | | Monthly income. |
|---|---|---|---|---|
| 1. | Shri | Sukhraj Gaurishankar Vyas. | Rs. | 600/- |
| 2. | " | Kishin Ginchand Bhadani. | " | 350/- |
| 3. | " | Vithal Ramchandra Pondage. | " | 550/- |
| 4. | " | Hotchand Manikram Purjani. | " | 300/- |
| 5. | Kumari | Hardevi P. Shamdasani. | " | 700/- |
| 6. | Shri | Vasant Govind Rao Samant. | " | 450/- |
| 7. | " | Raichand Gosar Shah. | " | 450/- |
| 8. | Smt. | Bhagwanti Meghji Marnia. | " | 600/- |
| 9. | Shri | Mohanlal Gohil. | " | 600/- |
| 10. | " | Premchand Devraj. | " | 500/- |
| 11. | " | Kantilal Devchand Shah. | " | 450/- |
| 12. | " | Vasant Damodar Nayak. | " | 517/- |
| 13. | " | Govindram Oga. | " | 500/- |
| 14. | " | Bhojraj Tarachand Malkani. | " | 500/- |
| 15. | " | Arjan Gurdarsing. | " | 300/- |
| 16. | " | Parmanand Gobindram. | " | 600/- |
| 17. | " | Shankerlal Bhatt. | " | 550/- |
| 18. | " | Baburao Shankar Gaikward. | " | 500/- |
| 19. | " | Khetsi Poonja. | " | 800/- |
| 20. | " | Hemraj Gosar. | " | 450/- |
| 21. | " | Raichand Popat Shah. | " | 500/- |
| 22. | " | Virchand Malji. | " | 600/- |
| 23. | " | Jagjivan Mahavdas Rathore. | " | 600/- |
| 24. | " | Premchand Maldo. | " | 400/- |
| 25. | " | Premchand Shah. | " | 500/- |
| 26. | " | Nemchand M. Shah. | " | 500/- |

-X-X-X-X-X-X-

179 (14)

No.C/LND-5-II-BI-Ambivali,
Addl.Collector's Office,B.S.D.
Old Custom House Yard, Fort,
Bombay-1.Dt. 31 Mar.1971.

**Read :-**

1. Govt. in Revenue and Forests Department's Resolution No.LCS/2665/V-A-I (Unit) dated 8th August 1966.
2. This office order No.C/LND-
3. Govt. in Revenue and Forests Department's Resolution No.LCS- 2665/5-II-BI dated 25-6-1970.

**CORRIGENDUM :**

For the words and figures " Government land comprising of two plots bearing No.74, 75 in the layout approved by the Town Planning Department from S.No.141-A of Ambivali in Bombay Suburban District". The words and figures 'Government land comprising of a plot bearing number 131- and 132 in the layout approved by Town Planning Department from S.No.141-A of Ambivali in Bombay Suburban District" should be substituted.

Sd/-
Additional Collector,
Bombay Suburban District.

To

Shri P.S.Vyas,
Chairman,
Vyas Co-op.Housing Society,
Room No.7, Anand Building,
Kalbadevi, Bombay-2.

Copy to :- 1. Dist. Inspector of Land Records,B.S.D.
2. The Sub Divisional Officer, B.S.D., Bombay,
3. Tahsildar Andheri for information.

Copy submitted to Govt. in Revenue and Forests Department Sachivalaya, for information and early orders passed if any vide this office letter of even No. dated 30-3-1970.

31/3/71

for Additional Collector,
Bombay Suburban District.

(661)

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

C:\My Documents\3c-A-315 order.doc

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com

क्र. :-०२/१४१-अ/३क/अे५१५

दिनांक :- २९/८/२००३

वाचले :- १) शासन महसूल व वन विभाग ठराव क्र.एलसीएस-२६६५/७-अे/१/(युनिट) दिनांक ८/८/१९६६.

२) मा.मंत्री (महसूल) यांचे निकाल पत्र क्र.एलसीएस-२६९८/१५८/प्र.क्र.७४६७/ज-३ दिनांक १७/११/९८,

३) कार्यालयीन सम क्रमांकाचे दिनांक ४/८/१९९९ चे पत्र.

४) व्यास सहकारी गृहनिर्माण संस्था यांचेकडील दिनांक १/१०/१९९९ व ३१/१०/१९९९

आदेश :-

उपोद्घातातील अनुक्रमांक १ अन्वये व्यास सहकारी गृहनिर्माण संस्था यांना मौजे-आंबिवली, तालुक-अंधेरी येथील स.क्रं. १४१-अ ,भू.क्रं.१३१, १३२ मंजूर करण्यात आली आहे. उपोद्घातील अनुक्रमांक २ अन्वये ज्या सदस्यांनी त्यांच्या सदनिका मुळ सभासदांकडून/इमारत बांधकाम व्यवसायीकांकडून खरेदी केलेल्या आहेत. त्या किमंतीच्या ५०% रक्कम अनर्जित उत्पन्न म्हणून शासनास अदा करावी असे निदश देण्यात आल्यामुळे उपोद्घातातील अनुक्रमांक ३ अन्वये ३८ सभासदांची अनर्जित उत्पन्न रक्कम रुपये २०,३८,८००/- भरणेबाबत व्यास सहकारी गृहनिर्माण संस्थेस कळविणेत आले. त्या अनुषंगाने गृहनिर्माण संस्थेने उपोद्घातातील ४ अन्वये रक्कम रुपये २०,३८,८००/- या कार्यालयास अदा केली आहे. सदर जमिनीचा मुल्यांकनाचा अहवाल सहाय्यक संचालक नगर रचना मूल्यांकन यांचेकडून मागविलेला आहे. सदर अहवाल त्यांचेकडून प्रलंबित असल्यामुळे भविष्यामध्ये काही जास्त रक्कम भरावी लागल्यास ती आम्ही भरण्यास बंधनकारक असल्याचे हमीपत्र दिल्यामुळे तसेच २०% मागासवर्गीय सभासदांची अट प्रचलित धोरणानुसार शिथिल करण्यात आल्यामुळे सोबतच्या यादीतील ३८ सभासदांना मंजूरी देण्यांत येत आहे.

COLLECTOR OF (जिल्हाधिकारी) MUMBAI SUBURBAN DISTRICT (मुंबई उपनगर जिल्हा)

(सही)

जिल्हाधिकारी,

मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,

सचिव,

व्यास सहकारी गृहनिर्माण संस्था,

भू.क्रं. १३१ व १३२ ,मॉडेल टाऊन,

चार बंगला, अंधेरी (प.) मुंबई ५३.

3c-a130-mrs

C:\My Documents\3c-A--515 order.doc

**प्रतिलिपी** :-१) उपनिबंधक सहकारी संस्था ,के/प.विभाग ,महाराष्ट्र गृहनिर्माण भवन, रुम नं. ६९-अे, तळमजला, वांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ यांचेकडे माहितीसाठी रवाना.

२) तहसिलदार अंधेरी यांचेकडे माहितीसाठी रवाना

३) निवड नस्ती.

स्वाक्षरी 26/8/03

स्वाक्षर प्रविष्ट जिल्हाधिकारी यांचे करिता

जिल्हाधिकारी,

मुंबई उपनगर जिल्हाकरीता.

1563

- ७ -

<u>व्यास सहकारी संस्थेच्या बदल झालेल्या सभासदाची माहिती</u>

<u>"ऐ" बिल्डींग प्लॉट नं. १३१</u>

| अ.क्रं. | मुळ मंजूर सभासदाचे नांव | बदलाचे कारण | मंजूरी देण्यात येत असलेल्या सभासदांचे नांव | सदनिका क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.पुखराज जी.व्यास | राजीनामा | श्री.इरफान फक्की | ए-१ |
| २ | श्री.किशीन जी.तदाने | राजीनामा | श्री.दिनेश डी.पांचाळ | ए-२ |
| ३ | श्री.विठ्ठल आर.फोंडाजे | मृत्यू | श्री.शेख अझीम रसूल | ए-३ |
| ४ | श्री.हॉटचंद एम.मूरझाही | राजीनामा | श्री.डॉ.मनोज खिवसारे | ए-४ |
| ५ | कुमारी हैदेवी पी.शगदासनी | मृत्यू | डॉ.सोमनाथ भट्टाचार्य | ए-५ |
| ६ | श्री.वसंत जी.सामंत | राजीनामा | श्री.नारायण के.दाभोळकर | ए-६ |
| ७ | श्री.राकंद जी.शाह | राजीनामा | श्री.पी.एस.सांबामूर्ती | ए-७ |
| ८ | श्रीमती भागवंती एम.हरन्या | राजीनामा | श्री.रमेश के. जुले | ए-८ |
| ९ | श्री.मोहनलाल गोही | राजीनामा | श्री.मधुकर डी.कोंडूलकर | ए-९ |
| १० | श्री.प्रेमचंद देवराज | राजीनामा | श्री.रामनाथ जी.पाटील | ए-१० |
| ११ | श्री. कांतीलाल डी.शह | राजीनामा | श्री.रामचंद्र एन.मोकळ | ए-११ |
| १२ | श्री.वसंत डी.नायक | राजीनामा | श्री.हरीअप्पा ए.कोटीयन | ए-१२ |
| १३ | श्री.गोविंदराम ओझा | मृत्यू | श्री.के.एस.भारद्वाज | ए-१३ |
| १४ | श्री.भोजराज टी.मलकानी | राजीनामा | श्री.पुरुषोत्तम एस.पारकर | ए-१४ |
| १५ | श्री.अर्जुन गुलडारसिंग | मृत्यू | श्री.प्रकाश शिवलकर | ए-१५ |
| १६ | श्री.परमानंद गोविंदराम | राजीनामा | श्री.उत्तमकुमार बी.देसाई | ए-१६ |
| १७ | श्री.शंकरलाल भट्ट | राजीनामा | श्री.डी.कस्तुरी रंगन | ए-१७ |
| १८. | श्री.बाबुराव एस.गायकवाड | राजीनामा | श्री.सी.आर.आझगावकर | ए-१८ |
| १९ | श्री.केतसी पूंजा | मृत्यू | श्री.आदिल के.भूरे | ए-१९ |
| २० | श्री.हेमराज घोसार | राजीनामा | श्री.रामी ए.कुंगळे | ए-२० |

<u>"बी" बिल्डींग प्लॉट नं. १३२</u>

| अ.क्रं. | मुळ मंजूर सभासदाच नांव | बदलाचे कारण | मंजूरी देण्यात येत असलेल्या सभासदांचे नांव | सदनिका क्रमांक |
|---|---|---|---|---|
| २१ | श्री.राईचंद पी.शहा | राजीनामा | श्री.अखतर आझाद ए.गनी | बी-१ |
| २२ | श्री.वीरचंद हालजी | राजीनामा | श्री.झहीर शेख | बी-२ |
| २३ | श्री.जवजीवन एम.राठोड | मृत्यू | मीस .अनू धवन | बी-३ |
| २४ | श्री.प्रेमचंद मालदे | राजीनामा | श्री.बी.सुंदर | बी-४ |
| २५ | श्री.प्रेमचंद शहा | मृत्यू | श्री.प्रेम रीशी | बी-५ |
| २६ | श्री.नेमचंद एम.शहा | राजीनामा | श्रीमती कमरुनिसा सुखरी | बी-६ |
| २७ | -- | -- | मोतीराम संगीत नाटयम ॲकडमी | बी-७ |
| २८ | -- | -- | श्री.शेख अब्दूल करीमरीयाजूदीन | बी-८ |
| २९ | -- | -- | श्रीमती कुलभूषण कुमारी | बी-९ |
| ३० | -- | -- | श्रीमती आरती कैलाश | बी-१० |
| ३१ | -- | -- | श्री.लोरा डीसोझा | बी-११ |

COLLECTOR OF MUMBAI SUBURBAN DISTRICT

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

2/8/03

जिल्हाधिकारी

1665

-२-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२. | -*- | -- | श्रीमती इलायटा मारीया सिल्वेरीया | बी-१२ |
| ३३ | -- | -- | श्री.धर्मेश जी.देसाई | बी-१३ |
| ३४ | -- | -- | श्रीमती नरसीन एम.हिंगवाला | बी-१४ |
| ३५ | -- | -- | श्रीमती जानकी एम.अमीन | बी-१५ |
| ३६ | -- | -- | श्री.मधुकुमार एस.हाजरा | बी-१६ |
| ३७ | -- | -- | श्रीमती शमीम आर. बेग | बी-१७ |
| ३८ | -- | -- | श्रीमती जेबुनिस्सा एफ.मोहम्मद | बी-१८ |

URBAN DISTRICT

स्थळ प्रविवर जिल्हाधिकारी यांनी

28/8/13

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरिता.

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

आदेश क्र.०२/स.क्र.१११डी/३क/अे-~~१~~५९५

व्यास सहकारी गृहनिर्माण संस्था
**विरुध्द**
तहसिलदार अंधेरी

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम-१९६६ लगत**
**महाराष्ट्र जमीन महसूल (सजविला) नियम-१९७१ च्या नियम १५ अन्वये**

**प्रस्तावना :**

मुंबई उपनगर जिल्हयात कब्जेहक्काने व भाडेपट्टयाने शासकीय जमीन प्रदान केलेल्या प्रकरणांची तपासणी तथा प्रदान केलेल्या जमीनीबाबत प्रतिग्रहित्याने जमीन मंजूरीच्या संदर्भात विहित केलेल्या अटी/शर्तींचे पालन केले आहे किंवा कसे याबाबत शर्तभंग तपासणी मोहिम शासन, महसूल व वन विभागकडील परिपत्रक क्र.एलएनडी/१०९०/प्र.क्र.९४/ज-३ दि.२२/५/१९९० अन्वये हाती घेण्यात आली होती. त्याबाबत जमिनीचे स्थळ निरिक्षण करुन तहसिलदार अंधेरी यांना चौकशी अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले होते. त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार खालील प्रमाणे शर्तभंग आढळून आला आहे.

संस्थेचे नांव :- व्यास सहकारी गृहनिर्माण संस्था (म)
जमिनीचा तपशिल:- मौजे- आंबिवली , तालुका- अंधेरी, स. नं.१४१अ
भूखंड क्र.१३१,१३२, क्षेत्र-१६७२.०० चौ.मी.
प्रयोजन- निवासी

१) संस्थेने जमिन ताब्यात घेतल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या आंत बांधकाम पूर्ण केलेले नाही

२) सभासद हस्तांतरण शासनाच्या परवानगीने झालेले नाही.

या प्रकरणात संस्थेस त्यांची बाजू मांडण्याची संधी देवुन बाजू ऐकून जिल्हाधिकारी यांना सविस्तर चौकशी अहवाल सादर करणेसाठी कार्यालयीन पत्र क्र.जिल्हाधिकारी/स्वी.सहा/५३/२०११ दि.१६/०७/२०११ अन्वये तहसिलदार (महसूल) यांना प्राधिकृत करणेत आले होते. त्याप्रमाणे संस्थेला त्यांची बाजु मांडण्याची संधी दिली. सुनावणी अंती तहसिलदार (महसूल) यांनी सविस्तर चौकशी अहवाल माझेकडे सादर केला आहे. संस्थेने केलेले शर्तभंग, त्यावर मांडलेली बाजू, सादर केलेले लेखी उत्तर, कागदपत्र इ. विचारात घेण्यात आले आहेत.

**जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकिय इमारत १० वा मजला,शासकिय वसाहत,बांद्रा (पूर्व)मुंबई ५१**
**कार्यालय ९१-२६५५६७९९/२६५५७८०७ फॅक्स २६५५६८०५ इमेल collectormumbaisuburban@mah.gov.in**

E:\3 C\vyas.doc

गाव-आंबिवली , तालुका-अंधेरी , स.नं.१४१अ , भुखंड क्र.१३१,१३२, क्षेत्र-१६७२.०० चौ.मी. जमीन व्यास सहकारी गृहनिर्माण संस्थेस शासन, महसूल व वन विभाग क्र. एलसीएस- /१६६५/७/ओ-I/(Unit) दि.८/८/१९६६ अन्वये कब्जेहक्काने देण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार संस्थेस इकडील आदेश क्र.सी/एलएनडी/एसआर-२बी/आंबिवली/ दि.३१/०३/१९७१जमीन प्रदान आदेश निर्गमित करुन संस्थेस जमीनीचा ताबा दि.२९/०८/१९७२ देण्यात आलेला आहे. जमीन मंजूरीबाबत अटी/शर्ती बांधीलकीबाबत करारनामा संस्थेने निष्पादित केलेला आहे. यातील अटी शर्तीचा भंग झाल्याने संस्थेस कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.

**संस्थेची बाजु :-**

संस्थेने खालीलप्रमाणे आपली बाजू या प्रकरणामध्ये मांडली आहे.

१) संस्थेला इमारत बांधकामास विविध कारणांमुळे उशिर झालेला आहे. ताबा दिलेली जमीन ही खाडीपैकी असल्याने लेव्हलिंगसाठी तसेच सदर प्लॉटवर जाणेकरता पाहोच रस्ता नसल्याने संस्थेला स्वखर्चाने रस्ता तयार करावा लागला. तद्नंतर बांधकामास सन १९७९ साली सुरुवात झाली व इमारत बांधकाम सन १९८५ साली पुर्ण झाले.

२) संस्थेने सभासदांच्या सभासदत्व मंजुरीचे प्रस्ताव सन१९८६ ला आपणास सादर केलेले होते त्याला सन २००३ मध्ये मान्यता मिळाली आहे. तद्नंतर संस्थेतील काही सभासदांनी त्यांची सदनिका विक्री केल्याने सभासद हस्तांतरण झाले आहे त्यांचे प्रस्ताव मान्यतेसाठी लवकरच सादर करण्यात येतील.

**चौकशी अधिकारी यांचा अहवाल :**

१) संस्थेला जमीनीचा ताबा दि. २९/८/१९७२ ला देण्यात आलेला होता. संस्थेने इमारत बांधकाम दि. २८/८/१९७४ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु ते संस्थेने विहित मुदतीत पूर्ण केलेले नाही.तसेच महानगरपालिकेकडील रहिवास दाखला देखील सादर केलेला नाही. तसेच सदर बांधकामासाठी त्यांना लागणाऱ्या कालावधीसाठी सक्षम प्राधिकरणाकडून बांधकाम मुदतवाढ घेणे बंधनकारक होते. परंतु संस्थेने अशा प्रकारची मुदतवाढ घेतल्याबाबतचे कोणतेही कागदपत्र सादर केलेली नाहीत.सबब संस्थेने शर्तभंग केल्याचे सिध्द होते.

२) संस्थेत एकुण मुळ मंजूर ३८ सभासद होते. त्यातील १२ सभासदांनी त्यांचे सभासदत्व सदनिका विक्रीने हस्तांतरण केलेले आहे .सदर हस्तांतरणास शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही . सबब शर्तभंग झालेला आहे.संस्था शास्तीस पात्र ठरते.

**संस्थेने दाखल केलेले उत्तर /कागदपत्र व युक्तीवाद विचारात घेऊन खालीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात येत आहे**

**निष्कर्ष:-**

१) संस्थेने विहीत मुदतीत बांधकाम पूर्ण केलेले नाही.तसेच सक्षम प्राधिकरणाकडून आवश्यक बांधकाम मुदतवाढ देखील घेतलेली नाही.सबब शर्तभंग आहे.

२) संस्थेच्या उपविधीत काही तरतुद असली तरी शासनाच्या लेखी परवानगीशिवाय कोणत्याही नवीन सदस्याचे नाव संस्थेला नोंदविता येणार नाही किंवा सदस्य म्हणुन संस्थेला हस्तांतरण केलेल्या व्यक्तीचे

नाव घेता येणार नाही असे असुन ही संस्थेने १२ सभासदांचे हस्तांतरण हे परस्पर केलेले आहे सबब शर्तभंग आहे.

संस्थेने वर नमुद केल्याप्रमाणे जमीन मंजूरीकामी दि. ८/८/१९६६ च्या आदेशातील आणि संस्थेने निष्पादित केलेल्या करारनाम्यातील अटीचा भंग केल्यामुळे जमीन देण्याच्या शर्तीपैकी शर्तीचे उल्लंघन झालेले असल्यामुळे वरील दि.२५/५/२००७ च्या शासन धोरणामधील पृष्ठ क्र. १३, अ. क्र. १४ व १५ नुसार जिल्हाधिकाऱ्यांनी त्याबाबतीत कळविणारी नोटीस ज्या तारखेस पाठविली असेल त्या तारखेपासून ६ महिन्याच्या कालावधीत उल्लंघन सुधारण्याच्या दृष्टीने संस्थेने उपाययोजना करणे बंधनकारक आहे. सदर विहित मुदतीत उल्लंघन सुधारण्याच्या दृष्टीने कोणतीही उपाययोजना करण्याबाबत संस्थेकडून कसूर झाल्यास संस्था बेदखल केली जाण्यास पात्र ठरेल आणि कोणतीही भरपाई न देता ती जमीन त्यावरील इमारतीसह शासन परत घेईल, अशी तरतूद स्पष्ट करण्यात आलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता मी, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## - आदेश -

१) संस्थेने दि. २८/८/१९७४ ते आजतागायत या कालावधीसाठी प्रत्येकी दोन वर्षाच्या (टप्प्यामध्ये) बांधकाम मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करावा व विहित शुल्क भरुन या आदेशाच्या तारखेपासून ६ महिन्याच्या आत बांधकाम मुदतवाढ प्राप्त करुन घेऊन शर्तभंग नियमानुकूल करुन घ्यावा

२) शासन मान्यतेशिवाय सामावून घेतलेल्या सभासदांचे सभासदत्वास मान्यता घेण्यासाठी शासन धोरण दि.२५/५/२००७ नुसार संस्थेने सभासदांच्या पात्रता निकषाची कागदपत्रे व ठरावासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा व पात्र सभासद हस्तांतरणास मान्यता घ्यावी. अपात्र सदस्यांना काढुन सदनिका रिक्त कराव्या. सदरची कार्यवाही या आदेशाचे तारखेपासून ६ महिन्यात पुर्ण करावी.

३) उपरोक्त शर्तभंग ६ महिन्यात दुरुस्त करण्यास कसूर झाल्यास या आदेशाचे तारखेपासून ६ महिन्याच्या कालावधीनंतर शासन निर्णय दि.२५/५/२००७ चे परिशिष्ट ब अट क्र.१४ नुसार संस्थेवर कार्यवाही करावी.

सदर निर्णय सर्व संबंधितांना कळविण्यात यावा.

**ठिकाण:- बांद्रा, मुंबई**
**दिनांक:-२/३/२०१२** **मूळ प्रतिवर जिल्हाधिकारी यांची सही आहे**

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

प्रती,

अध्यक्ष/ सचिव,
व्यास सह.गृह.संस्था,
प्लॉट क्र.१३१,१३२, मॉडेल टाऊन,चार बंगला,
अंधेरी (प) , मंबई - ५३.

प्रत : १) उप निबंधक सहकारी संस्था, के पश्चिम विभाग, महाराष्ट्र गृहनिर्माण भवन, रु. नं. ६९-अे, तळमजला बांद्रा (पूर्व) मुंबई ५१ यांच्याकडे माहितीसाठी रवाना.
२) तहसिलदार अंधेरी यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
२/- त्यांनी आदेश संस्थेवर बजावून तारखेसह पोच या कार्यालयात सादर करावी.
३) नगर भूमापन अधिकारी, अंधेरी माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.